# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात लाचखोरांच्या विरोधातील खटल्यांची प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत**

**(१) ११७४ (१५-०१-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लाचखोरांच्या विरोधातील कारवाई मोठ्याप्रमाणात चालू असताना दुसरीकडे प्रलंबित खटल्यांची संख्या वाढत चालली आहे, राज्यात माहे ऑक्टोबरपर्यंत २८०० प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विभागात लाचखोरीची सर्वाधिक ५०० प्रकरणे प्रलंबित असल्याचे निष्पण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात विविध न्यायालयात २० वर्षापूर्वी लाच घेणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या खटल्याचा निकाल अद्यापही लागले नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने प्रलंबित खटले निकाली काढणे याबाबतीत कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) विधी व न्याय विभाग, अधिसूचना क्र. SPC १३१४/C.R.६७/D-IX दि. १७ ऑगस्ट २०१४ अन्वये राज्यातील सर्व संत्र न्यायाधिश, अतिरिक्त सत्र न्यायाधिश व तदर्थ अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांना लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम (Prevention of Corruption Act १९८८) अंतर्गत दाखल झालेली प्रकरणे चालविण्यासाठी विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अग्निशमन दलातील जवानांना कोणत्याही प्रकारची सुरक्षा मिळत नसल्याबाबत**

**(२) ४१५९ (२२-१२-२०१४). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अग्निशमन दलातील जवानांना कोणत्याही प्रकारची सुरक्षा मिळत नसून त्यांना सुरक्षाकवचाविनाच काम करावे लागत असल्याचा प्रकार माहे जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदशर्नास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन दलातील जवानांना सुरक्षेसाठी त्यांना आवश्यक त्या सुविधा तातडीने पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) नाही.

जुलै, २०१४ मध्ये आग व अन्य दुर्घटनांमध्ये १ अग्निशमन जवान मृत्यू व २३ जवान जखमी झाले आहेत.मात्र सुरक्षा उपकरणा अभावी असे झाल्याचे आढळत नाही.

(२) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) तसेच १३ व्या वित्त आयोगांतर्गत अग्निशमन साहित्य व विमोचन उपकरणे उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांना शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. अग्निशनम दल हे त्या-त्या महानगरपालिका/ नगरपालिकांच्या अखत्यारित आहे. महानगरपालिकांकडून अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना सुरक्षेसाठी आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई विभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, वृध्दाश्रम आणि उद्यान उभारण्यासाठी सवलतीच्या दरात भूखंड मिळण्याबाबत**

**(३) ६८५६ (०८-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागातील जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, वृध्दाश्रम आणि उद्यान उभारण्यासाठी सवलतीच्या दरात भूखंड मिळावा म्हणून घणसोली जेष्ठ नागरिक संघटनेने सिडकोकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेष्ठ नगारिक संघटनेने मागणी केल्यानुसार भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत सिडको प्रशासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्यापी कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) होय.

(२) सामाजिक सेवा सुविधाकरीता निर्देशीत केलेले भूखंड वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पात्र संस्थेस व्यवस्थापनाच्या मंजुरीनंतर वाटप करण्यात येतात व अशा प्रकारची जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर संस्थेने प्रस्ताव सादर करावा असे दि. २०.११.२०१३ च्या पत्रान्वये कळविले आहे. संस्थेने मागणी केलेल्या उपक्रमांकरीता वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन भूखंड वाटप करावयाची प्रक्रिया सुरु आहे.

या व्यतिरीक्त जेष्ठ नागरिकांच्या विरंगुळे केंद्राकरिता नवी मुंबई महानगरपालिकेस ऐरोली, सानपाडा येथील भूखंड वाटपासाठी सिडको संचालक मंडळाने मान्यता दिली असून वाटप प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई सिडको कार्यालयात सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचा-यांना फेरनियुक्ती दिल्यामुळे कार्यरत अधिकारी कर्मचारी यांच्यावर होत असलेला अन्याय**

**(४) ६८५९ (०७-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको कार्यालयात सेवा निवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांची मोठया प्रमाणावर फेरनियुक्ती करून त्यांच्याकडून कामे करून घेतली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांवर भरमसाठ खर्च होत असून त्यांच्या फेरनियुक्तीमुळे सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर पदोन्नती व कामाचे वाटप यासंदर्भात अन्याय होत असून कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अल्पशा पगारावर काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची फेरनियुक्ती तात्काळ रद्दबातल करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१), (२) व (३) सिडकोतील अनेक अनुभवी

निष्णात तज्ञ कर्मचारी/अधिकारी सध्या सेवानिवृत्त होत असल्याने त्यांची पोकळी निर्माण झाली आहे. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावरुन सिडकोतील नोकरभरती बंद आहे. त्यामुळे ती पोकळी भरुन काढण्यासाठी काही कर्मचारी, अधिकारी कंत्राटी तसेच कन्सलटंट म्हणून घेतले जात आहेत. सिडकोमध्ये येऊ घातलेल्या नवनवीन प्रकल्पामुळे (विमानतळ, नैना प्रकल्प, मेट्रो प्रकल्प) यामुळे कामाचा व्याप वाढलेला आहे. त्यामुळे ही कामे करण्यासाठी सल्लागार एजन्सी कन्संलटंट, कंत्राटि कामगार यांचा आधार घेतला जात आहे. तसेच सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचाऱ्यांना कामांचा दिर्घ अनुभव असल्याकारणाने त्यांची कंत्राटी पध्दतीने काही कालावधीसाठी फेरनियुक्ती केली आहे. तसेच ह्या अधिकारी/कर्मचारी यांची कंत्राट पध्दतीने

फेरनियुक्ती केल्यामुळे कायमस्वरुपी सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर पदोन्नती व कामाच्या वाटपाबाबत कोणत्याही प्रकारचा अन्याय होत नसून कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होण्यास मदत होत आहे. तसेच त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत**

**(५) ६८६६ (०७-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील वाहतुक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने सिडकोने मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याबाबत एकूण सहा छत्र मार्ग प्रस्तावित केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सहा छत्र मार्गापैकी बेलापूर-खारघर-तळोजा-कळंबोली-खांदेश्वर या छत्र मार्गाचा बेलापूर ते पेंढार हा पहिला टप्पा माहे ऑगस्ट, २०१४ पर्यंत कार्यान्वित करण्याचा व उर्वरित दोन टप्पे सन २०१५-१६ मध्ये सुरू करण्याचे सिडकोने प्रस्तावित केले असतांनाही अद्यापी पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मेट्रो रेल्वे प्रकल्पातील या छत्र मार्गात वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली व दिघा या छत्र मार्गाचा समावेश करून रखडलेल्या या मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी सन २०१५-१६ या वर्षीच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(४)असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निधीची तरतुद करण्याबाबत व मेट्रो रेल्वे प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१), (२) व (३) होय.
(४) दिल्ली मेट्रो रेल्वे कार्पोरेशन (डी.एम.आर.सी) यांनी सुचविलेल्या ६ मार्गापैकी प्रथम प्राधान्यक्रम असणाऱ्या बेलापूर-खारघर-तळोजा-कळंबोली-खांदेश्वर या छत्र मार्गावरील मेट्रो रेल्वे प्रणाली बांधण्याकरिता व देखभालीकरिता शासनातर्फे सिडकोची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात बेलापूर ते पेणधर ह्या ११.१ कि.मी. लांबीच्या छत्र मार्गाचे काम हाती घेण्यात आले असून सदर काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रस्तावित वाशी-घणसोली-महापे आणि दिघा-तुर्भे-बेलापूर हे मेट्रो रेल्वे छत्रमार्ग तिसऱ्या टप्प्यात समाविष्ट असल्यामुळे सदर बाबतीत विलंब झालेला नाही.

---

**सांबरी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे प्रवासी जेटी व जोड रस्ता बांधणेबाबत**

**(६) ७६६५ (०६-०४-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांबरी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथून पांडापूर येथे होडीद्वारे प्रवास करणारे प्रवासी मोठ्या प्रमाणावर असल्याने येथे प्रवासी जेट्टी व जेट्टीसाठी जोड रस्ता बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी प्रवासी जेट्टी व जोडरस्ता बांधलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) सदरचे काम सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत करण्याचे प्रस्तवित करण्यात आले असून अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

**साप्ताहीक सुटीच्या दिवशी काम केल्यानंतर मोबदला अत्यल्प असल्याच्या कारणास्तव पोलिस दलातील एका नाराज पोलिस शिपायाने सदरचे वेतन नाकारुन सरकारी तिजोरीत जामा केल्याबाबत**

**(७) ९२४९ (०६-०४-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिस शिपायांनी साप्ताहीक सुटीच्या दिवशी काम केल्यानंतर त्याबद्दलचा मोबदला रुपये ६८/- एवढा अत्यल्प असल्याच्या कारणास्तव पोलिस दलातील एका नाराज पोलिस शिपायाने सदर मोबदला शासनाच्या तिजोरीत जमा करण्यासाठी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पोलिस महासंचालकांना एका पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुट्टीच्या कालावधीतील कामाबाबतचे नियम व देण्यात येणा-या भत्याचे स्वरुप काय,

(३) पोलिस शिपायांचे सुट्टीच्या कालावधीत काम केल्याचा मोबदला वाढविण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय.
(२) पोलिस शिपायांनी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी कर्तव्य केल्यास, गृह विभागाच्या दिनांक २०.७.२००४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वेतनमर्यादेनुसार भत्ता दिला जातो.
(३) गृह विभागाच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्चये पोलीसांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात एक दिवसाचे वेतन (मुळ वेतन आर्थि भत्ते) देण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा येथील पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीत अनेक सोई-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(८) ९७६३ (०६-०४-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा येथील पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीत अनेक सोई-सुविधांचा अभाव असून सार्वजनिक शौचालयांमध्ये विद्युत पुरवठा नसणे, दोन कुटूंबांसाठी एक शौचालय, स्नानगृहांचा अभाव आदी समस्यांच्या विळख्यात पोलीस कर्मचा-यांचे कुटूंब सापडले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जीर्ण झालेल्या वसाहतींची दुरूस्ती व त्यांना सोई-सुविधा पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच भंडारा जिल्हयातील सर्व तालुक्यातील पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतींची दुरूस्ती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :**(१) भंडारी जिल्ह्यातील बहुतांश पोलीस निवासस्थाने फार जुनी असून काही प्रमाणात अडचणी आहेत.
(२) पोलीस मुख्यालय, भंडारा येथे ५२ पोलीस निवासस्थानासाठी आणि पोलिस स्टेशन, अडयाळ येथील १८ पोलीस निवासस्थांनासाठी प्रसाधनगृहाचे बांधकामाच्या प्रस्तावास तांत्रिक मंजुरी दिल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार मान्यता देण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील नागरिक संघर्ष समितीच्या वतीने त्यांच्या विरोधात व विविध मागण्याबाबत**

**(९) ११७३६ (०८-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील नागरिक संघर्ष समितीच्या वतीने त्यांच्या विरोधात व विविध मागण्यांसाठी दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी सिडको कार्यालयासमोर लाक्षणिक साखळी उपोषण करुन आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिक संघर्ष समितींच्या कोणकोणत्या मागण्या आहेत व त्यावर कोणता निर्णय घेतला आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या मागण्यांच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५) :**(१) होय,
(२) व (३) समितीच्या प्रशासकाची नियुक्ती करणे, कर आकारणी घर विक्रीनंतर करणे, पुर्ण रक्कम भरुनही भूखंडाची ताबा न देणे, हस्तांतरणासाठी बांधकाम पूर्णत्वाची अट रद्द करणे, सिडको कार्यालयाबाहेर नागरीकांची सनद प्रदर्शित करणे, वारसांची नोंद करणे चर्मकार समाजाला व्यवसायासाठी जागा देणे, छोटया भूखंडांना बांधकाम पूर्णत्वाची अट रद्द करणे, बांधकामासाठी एफएसआय वाढवून देणे, प्रशासकीय शुल्क रद्द करणे इत्यादी मागण्या असून सिडको महामंडळामार्फत प्रथम ५ मागण्या मान्य करण्यात आल्या असून इतर मागण्यांवर कार्यवाही सुरु आहे,
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली शहरातील जुन्या पोलीस वसाहतीमधील पोलीसाची निवासस्थाने अतिशय जुनी झाली असून मोडकळीस आल्याबाबत**

**(१०) १२९७८ (०७-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली शहरातील जुन्या पोलीस वसाहतीमधील पोलीसाची निवासस्थाने अतिशय जुनी झाली असून मोडकळीस आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहणा-या पोलीस कर्मचा-यांना नविन इमारतीमध्ये निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) हिंगोली शहरातील जुन्या पालीस वसाहतीमधील निवासस्थाने निजामकालीन असून मोडकळीस आलेली आहेत.
(२) पोलीस मुख्यालय, हिंगोली येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी १०० निवासस्थाने बांधण्याचा प्रस्तावास तांत्रिक मंजूरी दिल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार मान्यता देण्यात येईल .
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि. ठाणे) येथील पोलीस विभागीय कार्यालय उभारण्याबाबत**

**(११) १४२३९ (०७-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) येथील पोलीस विभागीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी अद्यापही भाड्याने घेतलेल्या जागेत कामकाज करीत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयासाठी चेरपोली ग्रामपंचायतीने ८ गुंठे जागा दिली असून ती जागा अपुरी पडत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालय उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) होय.

(२) उप विभागीय पोलीस अधिकारी, शहापुर यांच्या कार्यालयासाठी ग्रामपंचायतीने जागा दिलेली नसून जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशान्वये चेरपोली सर्वे न १०१ गट क्र. १४०, ०-३०.० हे आर. पैकी ०.०५-० जागा पोलीस विभागास वर्ग करण्यात आली आहे.

(३) उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व निवासस्थान बांधण्यासाठी उपलब्ध झालेली जागा योग्य नसल्याने पर्यायी जागेचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देहूरोड कॅन्टोन्मेंट(ता.मावळ,जि.पुणे ) गांधीनगर येथील जलकुंभाची संरक्षक भिंत पडल्याबाबत**

**(१२) १५४३४ (०७-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहूरोड कॅन्टोन्मेंट(ता.मावळ,जि.पुणे ) बोर्डाच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेतील गांधीनगर येथील जलकुंभाची संरक्षक भिंत पडल्यामुळे येथील जलकुंभाची सुरक्षा धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देहूरोड परिरातील सुमारे ३० हजार नागरीकांना पाणीपुरवठा करणा-या पाण्याच्या साठवण टाक्यांची सुरक्षा अत्यंत धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात पोलीस आणि कॅन्टोन्मेंट प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने सदर जलकुंभाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या गांधीनगर येथील जलकुंभाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५)** :(१) हे खरे आहे. परंतु यामुळे सदर जलकुंभाची सुरक्षा धोक्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सदर जलकुंभाच्या परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच सदर जलकुंभाच्या परिसरात २४ तास सिक्युरिटी सर्व्हिंग तैनात करण्यात आलेली आहे.
(४) सदर स्थितीच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी तातडीने कामाचे आदेश (Work Order ) कॅन्टीमेट बोर्डाने दिले असून सध्या भिंतीच्या दुरुस्तीचे काम चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यातील बंदराच्या विकासासाठी रेल्वे मार्गाचे जाळे विकसित करण्याच्या निर्णयाबाबत**

**(१३) १६३१९ (१२-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक विकासात बंदराचे महत्व लक्षात घेऊन राज्यात वाहतुकीच्या सुविधा गतिमान करताना बंदरांशी संलग्न विकासाला तसेच राज्यात रेल्वेचे जाळे विकसित करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाबरोबर करार करण्याच्या निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) सदर निर्णयाची अंमलबजावणी किती दिवसात करण्यात येईल व त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) जयगड (धामणखोल) बंदराला रेल्वे मार्गाशी जोडण्याबाबत जयगड-डिगणी हा रेल्वे मार्ग निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, कोकण रेल्वे व जएसडब्ल्यु जयगड पोर्ट यांच्यामध्ये विशेष हेतू वाहन कंपनी स्थापन करण्यात आली असून दिघी (जि.रायगड) बंदर मध्य रेल्वेला जोडणीसाठी दिघी-रोहा रेल्वे प्रकल्पासाठी सामंजस्य करारनामा दि.१८/४/२०१५ अन्वये दिघी पोर्ट व RVNL यांच्यामध्ये स्वाक्षांकित करण्यात आला आहे.
(३) जयगड डिगणी प्रकल्पाची एकूण रक्कम रु.७७५ कोटी आहे. तसेच कंपनीमार्फत भुसपदानाची कार्यवाही सरु आह. तर दिघी रोहा रेल्वे प्रकल्पाची एकूण रक्कम रु.७८६.८४ कोटी आहे.

---

**धुळे शहरातील वरखेडी रोड वर असलेला गांडूळ खत प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(१४) १६५०४ (१९-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील वरखेडी रोड वर असलेल्या गांडूळ खत प्रकल्पातून चांगल्या दर्जाचे खत निर्माण होत असून हे खत शहरातील लागवड केलेल्या वृक्षांना टाकण्यासारखे आहे असे असूनही केवळ साडे चार लाख रूपयांच्या थकीत रक्कमे मुळे हा प्रकल्प बंद स्थितीत असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्प चालू होण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५)** :(१) धुळे महानगरपालिकेने गांडुळ खत प्रकल्प उभारला असून, तो देखभाल दुरुस्ती थांबविण्याकरीता दिनांक ०१.०९.२०१४ पासून आस्था स्वंय सहकारी संस्था यांना देण्यात आलेला आहे.
महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगाली नसल्याने, त्यांची देयके वेळेवर अदा करता आली नाहीत. मात्र, सदर संस्थेस १ महिन्यांचे दिनांक १०.०७.२०१५ रोजी बील अदा केले गेले असुन, प्रकल्प सुरु करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.
(२) सदर प्रकल्प कार्यान्वित असुन, संबंधित संस्थेची उर्वरित देय रक्कम महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार अदा करण्याची तजविज महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे,
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडाळा ते महालक्ष्मी या दुस-या टप्प्यातील मोनोरेलबाबत**

**(१५) १६५६३ (११-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडाळा ते महालक्ष्मी या दुस-या टप्प्यातील मोनोरेलचा मार्ग मा. मुख्यमंत्री व नगरविकास खात्याची परवानगी न घेता बदलल्याचे माहितीच्या अधिकाराद्वारे दि. १३.४.२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्याने, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५)** :(१) सदर मार्गामध्ये अरुंद रस्ता असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकांचे पुनर्वसन करावे लागणार होते. तसेच अनेक झाडांना तोडावे लागणार होते. यामुळे प्रकल्पाची होणारी दिरंगाई टाळण्यायसाठी व टाटा कॅन्सर हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल, वाडिया हॉस्पिटल व अधिक रहिवाशी लोकांना मोनोरेलची सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांना प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने प्रदान केलेल्या अधिकारात मार्गिकेमध्ये बदल करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील महानगरपालिकेने धोकादायक इमारतींच्या मालमत्तांचा रेकॉर्ड ठेवल्याबाबत**

**(१६) १६५८५ (१२-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिकेने धोकादायक म्हणून जाहीर केलेल्या क्रॉफर्ड मार्केट येथील शिवाजी मंडई इमारतीत मुंबईतील लाखो इमारतींच्या मालमत्तांचा रेकॉर्ड ठेवण्यात आला असल्याचे माहे मे-२०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एखादी दुर्घटना घडून ही इमारत कोसळल्यास हा रेकॉर्ड मातीमोल होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धोकादायक इमारतीतील मुंबईतील लाखो इमारतींचा मालमत्तांचा रेकॉर्ड दुसरीकडे सुरक्षित जागेत ठेवण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाशी संबंधित मालमत्तांचा अभिलेख क्रॉफर्ड मार्केट येथील छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारतीमध्ये असून ती इमारत धोकादायक असल्यामुळे कोणतीही जीवितहानी होऊ नये म्हणून प्राधान्याने तेथील कार्यालये हलविण्यात आली असून, अभिलेख मात्र जागेअभावी तेथेच ठेवण्यात आला होता. तथापि सदर अभिलेख तेथून तात्काळ हलविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे,
(२) हे खरे नाही, सदर अभिलेख हा स्टीलच्या विशेष कॉम्पॅक्टरसमध्ये सुरक्षितरित्या परिरक्षित करण्यात आलेला आहे, त्यामुळे तो खराब होण्याची शक्यता नाही,
(३) ज्या सुरक्षित ठिकाणी सदर अभिलेख स्थलांतरीत करावयाचा आहे त्या चंदनवाडी महापालिका शाळेच्या जागेचे डागडुजीचे काम युध्दपातळीवर सुरु असून ते पूर्ण होताच मालमत्ता विभागचे अभिलेख तात्काळ स्थलांतरीत करण्यात येतील,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथे गेल्या सात वर्षात क्षयरोगामुळे नऊ हजार जणांचा मृत्यु झाला असल्याबाबत**

**(१७) १६७१७ (१७-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे गेल्या सात वर्षात क्षयरोगामुळे नऊ हजार जणांचा मृत्यु झाला असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजाराविरोधात कोणती सर्वांगीण उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, उपाययोजना केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५)** :(१) हे खरे आहे,
(२) या आजारास आळा घालण्यासाठी खालीप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे:-

- डॉट्स अंतर्गत प्रत्यक्ष देखरेखखाली क्षयरोग रुग्णांना आरोग्यकेंद्रामार्फत औषधोपचाराच्या संपूर्ण कालावधीकरिता औषध पुरवठा केला जातो,
- प्रशासकीय बळकटीकरणांतर्गत क्षयरोग नियंत्रणासाठी मुंबईची २४ विभागांमध्ये विभागणी केली असून, अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे,
- क्षयरोग निदानाची व्याप्ती वाढविण्यासाठी गेल्या ३ वर्षात शहरात चार पटीने क्षयरोग केंद्रे, क्षयरोग प्रयोगशाळा, डॉट्स उपचार केंद्रांची स्थापना केली आहे,
- क्षयरोग रुग्णांच्या सोयीसाठी घराच्या आसपास डॉट्स उपलब्ध करण्यासाठी डॉट्स प्रोव्हाईड्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत,
- पी.पी.आय.ए (Private Provider Interface Agency) च्या अंतर्गत खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व फार्मासिस्ट यांचा समन्वय साधून ७००० क्षयरुग्णांना १ वर्षात मोफत औषधे देण्यात आली आहेत,
- महापालिकेच्या वैद्यकीय अधिकारी व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना क्षयरोगाविषयी प्रशिक्षण देण्यात आले,
- सुप्रसिध्द अभिनेता श्री. अमिताभ बच्चन यांच्या सहभागाने "टी.बी. हारेगा, देश जीतेगा" या क्षयरोग नियंत्रण जनजागृती मोहिमेअंतर्गत विविध प्रसारमाध्यमातून जसे की, दूरचित्रवाणी, रेडिओ, वृत्तपत्रे, भित्तीपत्रके, होर्डिंग्सद्वारा क्षयरोगाचा प्रतिबंध व नियंत्रणबाबतचे संदेश मोठया प्रमाणावर जनमानसांत पोहोचविण्यात येत आहेत.
- क्षयरोगाबाबत पथनाटय, मोर्चे, रुग्णांच्या बैठक, डॉट प्रोव्हाइडर मिटींग इ. आयोजित करण्यात आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहातील ६५ लाख रुपयांचे सीसीटीव्ही वापराविना असल्याबाबत**

**(१८) १७०२३ (१२-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात आठ दिवसाच्या अंतराने अंमली पदार्थ व मोबाईल सापडल्याने कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असतांनाच

कारागृहातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गृहखात्याने उपलब्ध करून दिलेले लाखो रुपयांचे ६५ सीसीटीव्ही वापराविना असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मार्च २०१५ मध्ये खरेदी करण्यात आलेली सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम सुरु असून सदर प्रकल्पांतर्गत ६८ केमेरे खरेदी करण्यात आलेले आहेत. त्याचे लॅगचे काम व सर्व्हर रुमचे काम अंतिम टप्प्यात असुन सदर काम पूर्ण होताच सर्व केमेरे कार्यान्वित होतील.

---

## पुणे जिल्ह्यात मयत, दुबार स्थंलातरीत मतदारांची नावे डिलीट करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने जिल्हा प्रशासनाला दिले असल्याबाबत

**(१९) १७६१५ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात २१ विधानसभा मतदार संघात ८ हजार ९४७ मतदार स्थलांतरीत १२ हजार ८४५ मतदार मयत, दुबार स्थंलातरीत मतदारांची नावे कमी करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने जिल्हा प्रशासनाला दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजीच्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यातील दुबार, मयत, स्थंलातरीत मतदारांची नावे मतदार यादीतून कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी पत्र क्र.३२/१/२०१५-ईआरएम, दि.२७/०२/.२०१५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय मतदार याद्या शुध्दीकरण व प्रमाणीकरण कार्यक्रम घोषित केलेला आहे. सदर कार्यक्रम संपूर्ण भारतात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदारांची छायाचित्र, मतदार ओळख पत्रातील माहिती व UIDAI ची आधारकार्डामधील माहिती यांची सांगड घालणे, तसेच मतदार यादीतील दुबार, मयत तसेच स्थलांतरित मदारांची नांवे वगळणे, छायाचित्र मतदार ओळखपत्रातील चुका दुरुस्त करुन प्रमाणिक मतदार याद्या तयार करणे हा आहे. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणी

दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने दिलेलया निर्देशानुसार आधार कार्डाशी सांगड घालण्याचा कार्यक्रम स्थगित केला आहे.
(२) लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील कलम २२ व मतदार नोंदणी नियम १९६० मधील कलम २१ (अ) मधील तरतुदीनुसार मतदार यादीतील दुबार, मयत तसेच स्थलांतरित मतदारांची नांवे वगळण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील नगर रस्त्यावर वडगावशेरी, रामवाडी चौकात भुयारी मार्गाचे कामाबाबत**

**(२०) १७६१८ (११-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील नगर रस्त्यावर वडगावशेरी, रामवाडी चौकात मागील सात वर्षापासून भुयारी मार्गाचे काम सुरु होते सद्यःस्थितीत सदरील काम अर्धवट सोडून प्रशासनाने कामच बंद केले असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्धवट काम सोडल्यामुळे परिसरात वाहतूक कोंडी वाढत असल्याचे आळढून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील भुयारीचे काम पूर्णत्वास नेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५) :**(१) नाही,
भुयारी मार्गाचे काम सुमारे ८०% पूर्ण झालेले आहे. कल्याणी नगर ते विमानतळाकडे जाणारी एकेरी मार्गिका वाहतूकीकरीता दिनांक १३.१०.२०१४ पासून रहदारीकरीता खुली करणेत आलेली आहे.
वडगव शेरी स.नं.३० पैकी आगरवाला यांचे मिळकती संबंधी न्यायलयीन दावा असल्याने तात्पुरत्या काळाकरीता विमानतळाकडून येणाऱ्या अप्रोच रस्त्याचे काम करण्यास कायदेशीर अडचण निर्माण झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) नाही.
सिध्दार्थ नगर झोपडपट्टीतील नागरीकांशी (रहिवाशी) चर्चा करुन सामोपचारोन व समन्वये साधून भुयारी मार्गाचे काम अहोरात्र करणेत आले. वर्तमान स्थिती झोपडपट्टीच्या लागतचे मार्गाचे काम पूर्ण करण्यात आले व दिनांक १३.१०.२०१४ पासून भुयारी मार्गातून कल्याणी नगर ते विमानतळ रस्ता एकेरी वाहतुक सुरु करणेत आली आहे. यामुळे या परिसरातील वाहतूक सुरळीत होणेस मदत झाली आहे.
(३) वडगव शेरी स.नं.३० पैकी आगरवाल कुटूबियांचे मिळकती संबंधात पुणे येथील न्यायालयात तसेच मुंबई उच्च न्यायालयात महानगरपालिकेविरुध्द दावा दाखल केलेला आहे.

दोन्ही दाब्यामध्ये वकीलामार्फत महानगरपालिकेची कायदेशीर बाजू मांडण्यात येत असून सदर दोन्ही दाव्यातील न्याय निर्णयानुसर उपरोक्त नमूद केलेले अप्रोच रस्त्याचे काम त्वरीत हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन करणेत आलेले आहे व त्याकरीता सन २०१५-१६ चे महानगरपालिका अंदाज पत्रकामध्ये आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील येरवडा तुरुंगाच्या अंडासेलमधील कैद्यांपर्यंत तुरुंग रक्षक मोबाईल पुरवित असल्याबाबत**

**(२१) १८०३७ (१०-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील येरवडा तुरुंगाच्या अंडासेलमधील कैद्यांपर्यंत तुरुंग रक्षक दोन ते अडीच हजार रुपये घेऊन मोबाईल पुरवित असल्याची प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर पोलीस आयुक्तांनी चौकशी करुन अहवाल जेलविभागाचे प्रमुख व अप्पर पोलीस महासंचालक यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहवालातील निष्कर्षानुसार तुरुंग रक्षकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
दिनांक ६.५.२०१४ रोजी येरवडा मध्यवती कारागृह अधिकाऱ्यांनी अचानक घेतलेलया झडतीमध्ये न्यायधीन बंदी मुन्ना दावल शेख यांचा कोठडीमध्ये मोबाईल जप्त करण्यात आला.
यांप्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास सुरु असून सहाय्यक पोलीस निरीक्षक येरवडा पोलस स्टेशन यांनी अंतरीम अहवाल सादर केला आहे.
(२) प्रस्तुत अहवालानुसार गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला नाही. तथापी तुरुंग प्रशासनाकडून ५ तुरुंग रक्षकांना निलंबीत करण्यात आले आहे. तसेच २ तुरुंगाधिकारी श्रेणी-१ व १ तुरुंगाधिकारी श्रेणी-२ यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या नागरी भागात “स्वच्छता सप्तपदी” या नावाने स्वच्छता अभियान राबविण्याबाबत**

**(२२) १८३०९ (११-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या नागरी भागात "स्वच्छता सप्तपदी" या नावाने स्वच्छता अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियान राबविण्यास टाळाटाळ किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या महानगरपालिका व नगरपालिकांचे अनुदान बंद करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेची अंमलबाजवणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यातील नागरी भागात "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून या अभियानांतर्गत "स्वच्छ सप्तपदी" हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी दि.१५ मे, २०१५ पासून सुरु झालेली आहे.

---

**कोकणातील बंदरे खाजगीकरणातून विकसित करण्याबाबत**

**(२३) १८३७५ (१२-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील बंदरे खाजगीकरणातून विकसित करण्याचा तसेच व बंदराना रेल्वे व रस्ते मार्गाने जोडण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१५ च्या तिस-या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) जयगडबंदर रेल्वे मार्गाशी जोडण्याबाबत जयगड डिंगणी या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्र मेरीटाईन बोर्ड, कोकण रेल्वे , जेएसडब्ल्यु यांच्यामध्ये विशेष हेतु वाहन कंपनी स्थापन करण्यात आली. तसेच दिघी रोहा रेल्वे प्रकल्पासाठी सामंजस्य करारनामा दिघ्घी पार्ट RVNL यांच्यामध्ये स्वाक्षांकीत करण्यात आला.
जयगड बंदराला जोडणारा जयगड निवळी रस्ता जयगड पोर्ट ल. यांचेकडे रुंदीकरण व मजबुतीकरणासाठी हस्तांतरित करण्यात आला आहे. दिघी बंदरापासून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ पर्यंत जाणारे राज्यमार्ग क्र. ९२,९६,९७ हे मेसर्स दिघी पोर्ट यांचेकडे दि. हस्तांतरित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विजयदुर्ग बंदराचा विकासाबाबात**

**(२४) १९५०४ (१०-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बंदरे केंद्रीभूत धरुन विकासाची घोषणा माहे एप्रिल, २०१५ मध्ये त्या दरम्यान मा. मुख्यमंत्र्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्रीभूत बंदरामध्ये विजयदुर्ग बंदराचा विकासाचा समावेश करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, आघाडी सरकारने या बंदराची घोषणा करुन साडेतीन हजार कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प अहवाल हिंदुस्थान इन्फ्रास्ट्रक्चरकडून तयार करुन घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बंदराच्या विकासाच्या कामाला प्रत्यक्षात केव्हा पासून सुरुवात होणार आहे,

(५) असल्यास, सदर विकास कामांमध्ये कोणकोणत्या बंदराच्या समावेश करण्यात आला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) शासनाच्याबंदर विकास धोरणाप्रमाणे, किनारपट्टीवरिल बंदराचा विकास करण्यात येत असून त्यामध्ये विजयदुर्ग बंदराचा समावेश आहे.

(३) कंपनीकडून सविस्तर प्रकल्प अहवाल अद्याप तयार करण्यात आला नाही.

(४) विजयदुर्ग बंदर प्रकल्पाकरिता पर्यावरण दाखला प्राप्त झाल्यानंतर बंदराच्या बांधकामास सुरुवात करण्यात येईल.

---

**नवी मुंबईत बोडो अतिरेक्यांना अटक करण्यात आल्याबाबत**

**(२५) १९६८९ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात बोडो अतिरेक्यांना अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे अतिरेकी नवी मुंबईमध्ये सापडणे नवीन नसून यापूर्वीही अनेक अतिरेक्यांना नवी मुंबईहून अटक केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्राप्त होणाऱ्या गोपनीय इशाऱ्यांच्या अनुषंगाने दहशतवाद विरोधीपथकास सतर्क करण्यात येऊन गोपनीय माहिती मिळविण्यात येते. तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये याकरिता सर्व संबंधित कार्यक्षेत्राच्या घटक प्रमुखांना वेळीच सतर्क करण्यात येते. या घटनांना मुकाबला करण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती तयार करण्यात आली असून वेळोवेळी सराव (Mock Drill) करण्यात येतो. महत्वाच्या व संवेदनशील स्थळांचा सुरक्षा आढावा घेण्यात येऊन त्रुटींबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोनोरेल प्रकल्पाच्या कामाबाबत**

**(२६) १९८५६ (१२-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुमारे १९.५४ किलोमीटर लांबीचा मोनोरेल प्रकल्पाच्या कामाच्या संदर्भात कॅगच्या अहवालात गैरव्यवहार रेल म्हणून कडक ताशेरे ओढले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कॅग अहवालाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, कॅग अहवालातील आरोपाबाबत शासन स्तरावर सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद् नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मोनोरेल प्रकल्पाच्या कामाच्या संदर्भात निरीक्षण महालेखापरिक्षक (कॅग) यांनी त्यांच्या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, सदर प्रकल्पाचे बांधकाम करताना भौगोलिक परिस्थितीच्या आधारावर करारनाम्यामध्ये दिलेल्या तांत्रिक तपशिलामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. तथापि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत जे काही बदल करण्यात आलेले आहेत ते तज्ञ लोकांच्या सल्ल्याप्रमाणे करण्यात आलेले आहेत तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मार्गदर्शकतत्वानुसार सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात आला आहे.

---

**आर्थिक गुन्हे शाखेला सुसज्ज कार्यालय देण्याबाबत**

**(२७) २००२२ (१०-०८-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व सामान्य नागरीक गुंतवणूकदारांच्या फसवणूकीचे गुन्हे हाताळणा-या आर्थिक गुन्हे शाखेवर सुसज्य कार्यालयासाठी वणवण करण्याची वेळ ओढवली आहे, हे खरे आहे काय,
(२) मुंबई पोलीस आयुक्तालयातील इमारत धोकादायक ठरविण्यात आल्याने आर्थिक गुन्हे शाखेतील एकूण १४ युनिटर्स पैकी ३ युनिटर्सना तात्पुरत्या स्वरुपात तूर्तास भायखळ्यातील वाहतूक प्रशिक्षण केंद्रात हलविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) सदरहू तात्पुरत्या स्वरुपातील कार्यालयात पंखे, पिण्याच्या पाण्याची सोय, काम करण्यासाठी टेबल, खुर्च्या इत्यादी कोणत्याही मूलभूत सोयी-सुविधा पुरिवण्यात आलेल्या नाहीत, इतकेच नव्हे तर अपु-या जागेसह या युनिटर्सकडे स्वतःची वाहने देखील नसल्याने एखादया आरोपींला पकडण्यासाठी स्वतःच्या खिशातील रक्कम खर्च करुन भाड्याची वाहने घेवून जावे लागते आहे, हे ही खरे आहे काय,
(४) आर्थिक गुन्हेशाखा हा पोलीस दलातील अत्यंत महत्वाचा विभाग असल्याने या विभागातील शासनाने तातडीने कायमस्वरुपी कार्यालय उभारण्याच्या दृष्टीने कोणता ठोस निर्णय घेतला आहे,
(५) अद्यापी, निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५)** :(१) व (२) होय.
(३) हे खरे नाही. तात्पुरता स्वरुपातील कार्यालयात मुलभूत सोई सुविधा व वाहने पुरविण्यात आली आहेत.
(४) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई येथील प्रशासकीय इमारतीच्या आवारात नवीन इमारतीचे बांधकाम सुरु असुन, या इमारतीमध्ये आर्थिक गुन्हे विभागास सुसज्य कार्यालय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत समाविष्ट झालेल्या भिवंडी तालुक्यातील ग्रामीण क्षेत्रात मोठया प्रमाणात गोदामांची कामे सुरु असल्याबाबत

**(२८) २०७२२ (११-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत समाविष्ट झालेल्या भिवंडी तालुक्यातील ग्रामीण क्षेत्रात मोठया प्रमाणात गोदामांची कामे सुरु असून त्यातील अवैध बांधकामे मुंबई महानगरपालिकेच्या जवळ येत असतानाही संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे जलवाहिनीस धोका निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच भिवंडी तालुक्यातील ५२ गावांचा समावेश एमएमआरडीएममध्ये केला असून या क्षेत्राचा विकास आराखडा बनविण्यास दिरंगाई होत असल्याने स्थानिक भूमिपूत्र व रहिवाशांना आपल्या जुन्या घरांचा विकास करण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) व (२) सदर भागात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे विशेश नियोजन प्राधिकारी असून प्राधिकरणाचे क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी यांनी या भागात फिरुन माहिती मिळाल्यावरुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये २३८ अनधिकृत बांधकामावर कारवाई केलेली आहे. त्यातील १६ गाळ्यांचे निष्कासन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात आले असून उर्वरित प्रकरणी पोलीस बंदोबस्त प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे. सदर गोदामांची बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादित केलेल्या जागेवर उभारण्यात आलेली नाहीत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डिजीटल महाराष्ट्राच्या माध्यमातून शासन प्रक्रिया लोकाभिमुख व पारदर्शी करण्याबाबत**

**(२९) २११८२ (१०-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डिजीटल महाराष्ट्राच्या माध्यमातून शासन प्रक्रिया लोकाभिमुख आणि पारदर्शी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिजीटल महाराष्ट्र ही संकल्पना पुर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने आतापर्यंत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहेत,
(३) अद्यापि कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१५) :**(१) होय
(२) मा.मुख्यमंत्री महोदय, यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत ४३ बिंदु असलेल्या ई-प्रशासन कृती आराखड्यास मंजुरी देण्यात आली. या आराखड्याची अंमबजावणी सुरु असून आता पर्यंत खालील मुद्यांवर कार्यवाही पुर्ण झालेली आहे.

I. आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप सुरु
II. ई-टेंडरची मर्यादा रु.१० लक्ष वरुन रु.३ लक्ष पर्यंत कमी करण्यात आली.
III. ई-ऑक्शन बाबत शासन निर्णय निर्गमित.
IV. सेतू केंद्र, महाऑनलाईन पोर्टलवर आणने.
V. नागपूर विभागात १२५० महा-ई-सेवा केंद्र सुरु.

VI. डिजीटल लॉक्र प्रकल्पाची सुरुवात.

VII. ई-चलान पथदर्शी प्रकल्प सुरु.

VIII. ई-रजिस्ट्रेशन प्रकल्प सुरु.

IX. सीसीटीएनएस प्रकल्प सुरु.

X. RUPAY कार्ड च्या वापराबाब शासननिर्णय निर्गमित, इतर मुद्याबाबत संबंधीत विभागांकडे कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील शिवडी वडाळा डेपोला पुरवठा करण्यात येणा-या इथेनॉल वरील जकात रद्द करण्याची मागणी**

**(३०) २१९४१ (१०-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी वडाळा डेपोला पुरवठा करण्यात येणा-या इथेनॉल वरील जकात रद्द करण्याची मागणी इथेनॉल उत्पादकांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इथेनॉल वरील जकात रद्द करण्याच्या मागणीबाबत शासनाने काेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील पोलिस ठाण्यांमध्ये सोयी-सुविधा पुरविण्याबाबत**

**(३१) २२००९ (१०-०८-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील, करवीर व जुना राजवाडा व लक्ष्मीपुरी ही पोलिस ठाणी जुन्या इमारतीत असून शाहुपुरी पोलिस ठाणे जुन्या इमारतीत स्थलांतरीत झाले आहे तर राजारामपुरी पोलिस ठाणे नव्या खाजगी इमारतीत स्थलांतरीत झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलिस ठाण्यात पार्किग, स्वच्छ पाणी, पोलिस कोठडी, लाईट आदिची अत्यंत गैरसोयी आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलिस ठाण्यात असलेल्या गैरसोयीकडे शासनाचे लक्ष वेधूनही अदयापी कोणत्याच सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त पोलिस ठाण्यात सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासन स्ततरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) कोल्हापूर करवीर पोलीस ठाणे-तहसिलदार कार्यालयालयात जुना राजवाडा पोलीस ठाणे - जुन्या राजवाड्यात , लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे-शासकीय जागेत शाहूपुरी पोलीस ठाणे शासकीय इमारतीत आणि राजारामपुरी पोलीस-ठाणे शासनाच्या मालकीच्या जागेत नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये आहे.
(२), (३) व (४) नाही, हे खरे नाही. पोलीस ठाण्याच्या आवारात पार्किंगची सुविधा उपलब्ध असून, स्वच्छ पाणी, पोलीस कोठडी व पुरेशी लाईटची सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सध्या कोणत्याही प्रकारची गैरसोय नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेतर्फे नागपूर शहरातील प्रत्येक झोन मध्ये समुपदेशन केंद्र सुरु करणेबाबत**

**(३२) २२१२० (११-०८-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेतर्फे नागपूर शहरातील प्रत्येक झोन मध्ये समुपदेशन केंद्र सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेतील लखडगण झोन व लक्ष्मीनगर झोन येथील समुपदेशन केंद्र कर्मवीर बहुउद्देशीय संस्था व भारतीय बहुउद्देशीय संस्था यांच्या सन २०१३ मध्ये देयकाच्या नस्ती गहाळ झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात खालीलप्रमाणे वस्तुस्थिती नमूद करण्यात आलेली आहे :-

नागपूर महानगरपालिकेचे १० झोन मध्ये समुपदेशन केंद्र सुरु करण्याबाबतची मुळ नस्ती विभागात उपलब्ध आहे.

लकडगंज झोन व लक्ष्मी नगर झोन येथील कर्मवीर बहुउद्देशीय संस्था व भारतीय बहुउद्देशीय संस्था यांचे प्रत्येकी रु.८४,०००/- चे देयक पारित करण्याकरिता वित्त विभागात दिनांक २२/११/२०१३ रोजी सादर करण्यात आले. त्यानुसार देयक पारित झाले व सदर संस्थांना त्या देयकांचे भुगतान देखील झाले आहे.

सदर नस्तीचा शोध घेण्यास्तव संबंधित देयक लिपीकाद्‌यारे वित्त विभागात नस्तीचा शोध घेण्यात आला व संबंधित देयक लिपीक कडून खुलासा सुध्दा मागविण्यात आला.

मात्र सदर मुळ नस्त्या गहाळ झाल्या असल्या तरी त्यांची मुळ देयके वित्त विभागात उपलब्ध असून, कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

(४) सदर देयकाची मुळ नस्ती आढळून न आल्यामुहे दोन्ही नस्तीची मुळ देयके वित्त विभागातून प्राप्त करुन पुर्नबांधणी करण्यात आली आहे. तसेच मुळ नस्ती गहाळ झाल्याबद्दल संबंधित कनिष्ठ लिपीकांला यापुढे अशा प्रकारची पुर्नवरावृत्ती न होणेबाबत समज देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गांधीसागर तलावाच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबत**

**(३३) २२१५० (१०-०८-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराच्या मध्य भागात असलेले ऐतिहासिक गांधीसागर तलावाच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबत व सौदर्यीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रितनिधींनी सन २०१३ व २०१५ मध्ये शासनास प्रस्ताव पाठविण्यात पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेचे संबंधित विभागाचे अधिकारी शासनास प्रस्ताव पाठविण्यास टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वित्त मंत्री यांना गांधीसागर तलावाच्या सौदर्यीकरण व छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यासाठी निधी मागितला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.वित्त मंत्री यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना गांधीनगर तलावाचे एकत्रित प्रस्ताव सादर करावे, हे ही सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(५) नसल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५)** :(१) होय. नगपूर महापालिकेकडे असे पत्र देण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

संबंधित तलाव हा पुरातन कालीन तलाव असल्याने, तांत्रिक सल्लागाराकडून पुतळ्याची जागा निश्चित केली केल्यानंतर, याबाबत केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध विभागाकडून

ना-हरकत घेतल्यानंतर सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(३) होय.

(४) होय. गांधीसागर तलावाबाबतचे एकत्रीत प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.वित्त मंत्री यांनी दि.१७/२/२०१५ च्या पत्रात सूचीत केले आहे.

(५) प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव सादर करण्याबाबत महापालिका नागपूर यांचे स्तरावर योग्यती कार्यवाही सुरु आहे.

(६) उक्त प्रश्न भाग-२ च्या उत्तरात नमूद केल्यानुसरर नागपूर महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**चंद्रपूर शहर महरनगरपालिकेत मंजूर आकृतीबंधानुसार पदभरती करण्यासंदर्भात**

**(३४) २२१६८ (११-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहर महानगरपालिकेत मंजूर आकृतीबंधानुसार पदभरती करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी दिनांक १० मार्च, २०१५ ला मा.मुख्यमंत्री महोदयांना आणि नगरविकास विभागाला लेखी विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चंद्रपूर शहर महानगरपालिकेत मंजूर आकृतिबंधानुसार पदभरती करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :**(१) होय.

(२) चंद्रपूर महापालिकेच्या आकृतीबंधास दि.२८/५/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. तथापि, या आकृतीबधातील पदाबाबतचे सेवाप्रवेश नियम अद्याप अंतिमरित्या मंजूर झालेले नाहीत. त्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

दरम्यान, आयुक्त चंद्रपूर, महापालिका यांनी दि.४/३/२०१५ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुलक्षून, शासनस्तरवरुन, १ उपायुक्त, १ उप अभियंता, पाणीपुरवठा, १ वैद्यकीय अधिकारी १ सहाय्यक नगररचनाकार यांची चंद्रपूर महारपालिकेच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत मोनो रेल्वेची सेवा सुरु झाल्याबाबत**

**(३५) २२४७० (११-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मोनो रेल्वेची सेवा सुरु झाल्यापासून मागील १४ महिन्यात जेमतेम ५९ लाख ९८ हजार ६९ प्रवाशांनी मोनो ने प्रवास केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील कालावधीत जेमतेम पाच कोर्टाच्या आसपास महसूल मिळाला असून या कालावधीत मोनोच्या सुरक्षा रक्षकांसाठी १४ महिन्यांत १० कोटी रुपयांहून जास्त खर्च करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवासी व महसूल कमी आणि खर्च मात्र जास्त अशा परिस्थितीत मोनो आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर मात करण्यासाठी शासनाने कोणकोणत्या उपयायोजना केल्या आहेत व याची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) मोनोरेल प्रकल्पाचा टप्पा-२ (वडाळा ते संत गाडगे महाराज चौक) जून २०१६ पर्यंत सुरु होणे अपेक्षित असून प्रकल्पाचा टप्पा-२ कार्यान्वित झाल्यानंतर प्रवासी संख्येत वाढ होऊन महसूलामध्येही वाढ होण्याची अपेक्षा आहे.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील देवस्थान श्री.तुंगारेश्वर येथे पोलिस चौकी उभारण्याबाबत**

**(३६) २२७८३ (१२-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील पुरातन मंदिर म्हणून सुप्रसिध्द देवस्थान श्री.तुंगारेश्वर येथे मोठ्या प्रमाणात भाविक व पर्यटन येत असून दर्शनाला जाताना सुमारे ३ कि.मी. चा रस्ता जंगलातून जात असल्यामुळे तसेच तुंगारेश्वरच्या पायथ्याशी मोठ्या प्रमाणात वाढीस लागलेल्या लोकसंख्येमुळे सुरक्षिततेची गंभीर समस्या निर्माण झाल्याने तुंगारेश्वर परिसरात पोलिस चौकी उभारण्यात यावी अशा आशयाची मागणी श्री.तुंगारेश्वर देवस्थानच्या विश्वस्तांनी तत्कालीन गृहमंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये एक सविस्तर निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पोलिस चौकी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय,
(२) तुंगारेश्वर महादेव मंदिर वालीव पोलीस ठाणे हद्दीत येत असून तुंगारेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट तर्फे २५X१२ फुट लांबी रुंदीची पक्क्या स्वरुपाची पोलीस चौकी बांधण्यात आली आहे. महाशिवरात्री तसेच श्रावण महिन्यात शनिवार, रविवार व सोमवार या गर्दीच्या दिवशी

मुख्यालय व वसई विभाग तसेच वाहतूक शाखा वसई येथुन बंदोबस्त मागवून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने बंदोबस्त ठेवण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मानखुर्द, गोवडी (मुंबई पूर्व उपनगर जिल्हा) येथील अग्निशमन दलाची इमारत तातडीने कार्यान्वित करण्याबाबत**

**(३७) २२८६० (११-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर जिल्हा) येथील अग्निशमन दलाची इमारत कार्यान्वित करण्याबाबतची मागणी स्थानिक विभागातील जागरुक नागरीक, सामाजिक कार्येकर्ते, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री (नगरविकास) मा.राज्यमंत्री (नगरविकास) मा. जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर), आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, अतिरिक्त आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका पूर्व उपनगरे, आयुक्त (बृ.मुं.मनपा/पूर्व उपनगरे) सहाय्यक आयुक्त (एम/पूर्व बृ.मुं.मनपा) यांचे कार्यालयाकडे माहे जानेवारी, २०१५ वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखेर पर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यास येईल वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) मानखुर्द येथे दिनांक ०४.०८.२०१५ रोजी मानखुर्द अग्निशमन कैंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था यांचे कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(३८) २३१५६ (१३-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था यांचे कार्यालय सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने मा.निबंधक भागीदारी संस्था मुंबई यांचेकडून दि. २१ जानेवारी २०१४ रोजी अभिप्राय मागविलेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार नाशिक येथे सदर कार्यालय सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत निबंधक, भागदारी संस्था यांचे अभिप्रायानुसार याबाबतचा निर्णय शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेकडून प्रस्तावित असलेल्या ५०० चौ. फुटापर्यंतच्या घरांना वाढीव मालमत्ता करातून वगळण्याबाबत**

**(३९) २३४०७ (११-०८-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेकडून प्रस्तावित असलेल्या व शासनाकडे मंजूरीसाठी आलेल्या मालमत्ता कराच्या नव्या आकारणी मुळे ५०० चौ. फुटापर्यंतच्या घरांवरील पडणारा वाढीव बोजा कमी करुन घरांना वाढीव मालमत्ता करातून वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हा कधीपासून किती वर्षापर्यंत लागू करण्यात आली आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास त्यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ०१.०४.२०१५ ते ३१.०३.२०२० पर्यतच्या कालावधीसाठी वैध आहे. त्या अनुषंगाने सन २०१५-१६ या वर्षाची मालमत्ता कराची देयके वितरीत करण्यात आली आहेत.
(३) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

---

**पुणे शहरातील ऐतिहासिक शनिवारवाडा येथील ध्वनीप्रकरण योजनेसाठी खरेदी केलेले साहित्य वापराविना पडून असलेबाबत**

**(४०) २३६७४ (३१-०७-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ऐतिहासिक शनिवारवाडा येथील ध्वनीप्रकरण योजनेसाठी पालिकेच्या विद्युत विभागाने सुमारे तीन कोटी रुपयांचे खरेदी केलेले साहित्य पुरातत्व विभागाची परवानगी नसल्यामुळे गत सहा महिन्यांपासून वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरातत्व खात्याची परवानगी न घेताच सदरचे साहित्य खरेदी करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५)** :(१) शनिवारावाडा सल्लागार समितीच्या दिनांक ८.१०.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत निश्चित केल्यानुसार शनिवारवाडा येथे ध्वनी प्रकाश व्यवस्थेबाबतचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेमार्फत दिनांक १९.११.२०१४ रोजी भारतीय पुरातत्व विभागाकडे पाठविण्यात आला.

सदर कामाच्या अनुषंगाने दिनांक १२.१२.२०१४ रोजी जाहीर निविदा काढण्यात येऊन मे. प्रिमियरवर्ल्ड टेक्नॉलॉजी लि. कोलकाता यांची निविदा सर्वात कमी दराची असल्याने, या कंपनीस रुपये ४.४२ कोटी इतक्या रक्कमेचे कार्यादेश देण्यात आले असून, उक्त कामाची मुदत दिनांक ८.७.२०१५ पर्यंत होती.

उक्त कंपनीने पुरवठा केलेल्या साहित्यापोटी कंपनीस सुमारे रुपये २.३६ कोटी अदा करण्यात आले आहे. सदर साहित्य महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेलया बंदीस्त जागेत ठेवण्यात आले आहे.

(२) शनिवारवाड्यावर ध्वनिप्रकाश व्यवस्था करण्याच्या अनुषंगाने पुरातत्व विभागची परवानगी घेणे व सदर कामाची जाहिर निविद काढणे या दोन्ही बाबी एकाच वेळी करण्यात आल्या असल्याने, पुरातत्व विभागाची संमती मिळण्याआधीच साहित्याची खरेदी केली अशी वस्तुस्थिती नाही.

आता भारतीय पुरातत्व विभाग, नवी दिल्ली यांनी दिनांक २२.७,२०१५ रोजी भारतीय पुरातत्व विभाग, मुंबई या कार्यालयाच्या नियंत्रणाखाली काम करण्याची परवानगी दिली असून, त्यानुसार शनिवारवाडा येथे ध्वनिप्रकाश व्यवस्थेचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहर आणि परिसरातील नदीपात्र वा काठावर**
**असलेल्या झोपडीधारकाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४१) २३६७७ (१०-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर आणि परिसरातील नदीपात्र वा काठावर धोकादायक अवस्थेत राहणाऱ्या झोपडीधारकाचे पुनर्वसन दहा दिवसांत बीएसयूपी योजनेच्या निवासी संकुलात करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त यांनी दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार आतापर्यंत किती झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उर्वरित झोपडीधारकांचे पुनर्वसन किती कालावधीत पूर्ण करण्याचे शासनास अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५)** :(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील आधारकार्ड नोंदणीच्या कामाची गती वाढविण्यासाठी महा ई सेवा केंद्राच्या ठिकाणी नोंदणी सुरु करण्याबाबत**

**(४२) २३८०० (१०-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील आधारकार्ड नोंदणीच्या कामाची गती वाढविण्यासाठी महा ई सेवा केंद्राच्या ठिकाणी नोंदणी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत सुरु करण्यात आलेल्या केंद्रावर नोंदणीसाठी ऑपरेटर हजर राहत नसल्याने गरजूंना ताटकळत बसावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५)** :(१) होय.
(२) नाही.याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासाबाबत**

**(४३) २३९४२ (१२-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासासंदर्भात पंढरपूरचे विठ्ठल मंदिर, सोलापुरचे सिध्देश्वर मंदिर आणि अक्कलकोटचे स्वामी समर्थ मंदिर हे मेगा सर्कीट करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पर्यटन विकासासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१५) :**(१) केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत सोलापूर मेगा सर्किट या योजनेत सोलापूर-पंढरपूर-तुळजापूर अक्कलकोट या स्थळी पर्यटन सुविधा विकसित करण्याच्या कामास केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने मंजुरी दिलेली आहे.
(२) केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने निधी वितरीत केला असून या वितरीत निधीच्या उपलब्धतेनुसार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत सदरची कामे प्रगतीपथावर आहेत
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर उत्तर विभागातील नागपुर महानगरपालिका, आसी नगर, विभागीय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांचा अनागोंदी कारभारामुळे घरकुल योजनेचे लाभापासुन वंचित असल्याबाबत**

**(४४) २३९६४ (११-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर उत्तर विभागातील नागपुर महानगरपालिका, आसी नगर, विभागीय कार्यालय अधिकारी यांचा अक्षम्य दुर्लक्षामुळे घरकुल योजनेचे लाभार्थी लाभापासुन वंचित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आसी नगर झोन चे सहाय्यक आयुक्त यांचा निष्काळजीपणामुळे या योजनेत गैरव्यवहार झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आसी नगर झोन चे उपविभागीय अभियंता तसेच अन्य अभियंते या योजनेस कार्यान्वीत करण्यात अपयशी ठरले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या अनागोंदी कारभारामध्ये सहभाग असलेल्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी अध्यक्ष/सचिव सहारा बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांचे विरोधात पांचपावली पोलीस स्टेशन, नागपूर येथे आसीनगर झोन कार्यालयात या प्रकरणी तकार करण्यात आलेली आहे. पांचपावली पोलीस स्टेशन कार्यालयाकडून पुढील चौकशी सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) नाही.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस चौकशी पूर्ण न झाल्यामुळे कथित अनागोंदी कारभारामध्ये सहभागी असल्याचे निष्कर्ष काढणे शक्य झालेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधा अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची प्राप्त गुणवत्ता पडताळणी अहवालानुसार कार्यवाही करण्याबाबत

**(४५) २४०७८ (१०-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधा निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांचे कडून गुणवत्ता पडताळणी करुन घेण्यात आली असून त्यांचा अहवाल प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुणवत्ता पडताळणी केलेल्या कामांचा दर्जा निकृष्ट असून मानकानुसार कामे झाली नसल्याची बाब नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असलयास, या गैरप्रकारात सहभागी असलेल्या संबधितांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्याचे योजिले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :**(१) होय.
(२) मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक ३१/१२/२०१४ च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रक मंडळ, अमरावती यांना एकूण १० कामांची गणुवत्ता पडताळणी करुन देण्याबाबत कळविले होते.

यापैकी प्राथमिक सोयी सुविधा अंतर्गत झालेल्या अमरावती शहरातील शेगांव नाका ते जुना कॉटन मार्केट पर्यंत डांबरीकरण करणे (विलासनगर ते लेखुमल) या रस्त्याचे अधिकक्षक अभियंता, सा.बां.वि., दक्षता व गुण नियंत्रक मंडळ, अमरावती यांच्या कडून गुणवत्ता पडताळणी करुन घेण्यात आली असून यामध्ये खालीलप्रमाणे निष्कर्ष आढळून आलेले आहेत :-

बी.बी.एम.करिता मानकापेक्षा मोठ्य आकाराचे खडी वारल्याचे आढळून आले आहे.
डांबरीकरणाचे धराची जाडी काही भागात अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा कमी असल्याचे आढळून आले.

अहवालात सदर कम निकृष्ठ असल्याचे नमूद नाही. सदर काम प्रगतीत असतांना वापरण्यात आलेल्या सहित्याचे जिल्हा प्रयोग शाळा (सा.बा.वि., अमरावती) येथे चाचणी अहवाल घेण्यात आले असून ते मानकानुसार बरोबर असल्याचे अहवालात नमूद आहे.
(३) प्रस्तुत कामाचे अद्याप अंतिम मोजमाप व त्या अनुषंगाने अंतिम देयक दिले नसल्याने महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुसान झालेले नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

## पुणे महानगरपालिका प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि रस्ते खोदाईची कामे पूर्ण करण्याचे आदेश दिल्याबाबत

**(४६) २४०९९ (११-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका प्रशासनाने पावसाळयापूर्वी नालेसफाई आणि रस्ते खोदाईची कामे पूर्ण करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्तांनी दिले असताना, सर्व नाल्यांची सफाई करण्यासाठी महानगरपालिकेने कोटयावधी रुपये खर्च करुन केवळ साठ टक्केच नाला सफाईची कामे पूर्ण झाल्याची कबुली पुणे महानगरपालिका प्रशासनाने दिल्याची असल्याची बाब मे, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेच्या परिमंडळा अंतर्गत असलेल्या नालेसफाईची कामे मे, २०१५ अखेरपर्यंत अंदाजे ९८.३९ अक्के पूर्ण करण्यात आली असून, माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कर्मचाऱ्यांना कॉर्पोरेट क्षेत्राप्रमाणे केआरए (की रिझल्ट एरिया) प्रणाली लागू करण्याबाबत

**(४७) २४४२४ (१२-०८-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांना कॉर्पोरेट क्षेत्राप्रमाणे केआरए (की रिझल्ट एरिया) प्रणाली लागू करण्याचे शासनाने जाहिर केले असून कर्मचारी संघटनांनी आधी शासकीय कार्यालयातील रिक्त पदे १०० टक्के भरुन कार्यालयात सुविधा व्हाव्यात नंतरच ही प्रणाली लावावी अशी मागणी केली असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी संघटनाच्या या मागणीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :**(१) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दिनांक १० एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये, प्रत्येक विभागांसाठी निश्चित करण्यात आलेल्या महत्वाच्या फलनिश्चिती क्षेत्रांवर (Key Result Areas) मा.मुख्यमंत्री हे Chief Minister Transformation Office मार्फत

देखरेख करणार असल्याने सर्व मंत्रालयीन सचिवांना कळविण्यात आलेले आहे. तथापि आधी शासकीय कार्यालयातील रिक्त पदे १०० टक्के भरुन कार्यालयात सुविधा व्हाव्यात नंतरच ही प्रणाली लावावी अशी मागणी केल्याबाबतचे पत्र कर्मचारी संघटनेकडून प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचोरा तालुक्यातील भोकरी (वरखेडी) गावात बनावट पिस्तुल व जीवंत काडतुस सापडल्याबाबत**

**(४८) २५२७६ (१०-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा तालुक्यातील भोकरी (वरखेडी) गावात बनावट पिस्तुल व जीवंत काडतुस बाळगणाऱ्यास पिंपळगाव पोलीसांनी तसेच भुसावळ शहरात गावठी पिस्तुलसह गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्यावर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यानूसार पुढे कोणती कारवाई करण्यात येणार आहे,

(३) तसेच सदर शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्याकरिता शासन कोणती ठोस भुमिका घेत आहे वा घेणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय,

(२) पाचोरा तालुक्यातील भोकरी (वरखेडी) येथील घटनेत बनावट पिस्तुल व जिवंत काडतुस बाळगणाऱ्या गुन्हेगारांना ताब्यात घेवून आरोपींविरुध्द पिंपळगाव हरे पो.स्टे. ला भाग ६ गु.रं. क्र. २४/२०१५ भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,४३ २५ प्रमाणे दिनांक ३ जून, २०१५ राजी रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच भुसावळ शहरातील खडका रोड भागात बेकायदेशीररित्या हत्यार १ पिस्तुल बाळगण्याबद्दल तीन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरुध्द भुसावळ बाजारपेठ पो.स्टे.ला भाग ६ गु.र.नं. ३०५९/२०१५ भा.ह.का.क. ३, ४, २५ नुसार आहे. दिनांक १८ जून, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (१) दिपेश मुकेश मालविया वय २२ वर्षे (२) सचिन भिमराव वाघ, वय २३, वर्षे (३) गणेश लक्ष्मीनारायण तल्लारे वय २१ वर्षे सर्व राहणार भुसावळ,

(३) परिसरातील नागरिकांचे सुरक्षिततेकरिता सतत पोलीस कर्मचाऱ्यांची पेट्रोलिंगसह रात्रीची गस्त कार्यान्वित केली आहे. परिसरात घडलेल्या सर्व गंभीर घटनांसह संवेदनशील घटनांमध्ये पोलीस प्रशासनाने वेळीच सतर्कता बाळगून व लक्ष पुरवून आवश्यक तथा परिणामकारक कायदेशीर कारवाईसह प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन दाखल झालेल्या गुन्ह्यामधील आरोपी निष्पन्न करुन आरोपी अटकेची कारवाई करुन घेतली आहे. महिला, मुलींचे लैगिंक शोषण संदर्भात माहिती मिळवून PITA कायद्यांतर्गत कारवाई केली आहे. शहरात सातत्याने

कोम्बींग नाकाबंदी करुन ८५ गुन्हेगारांचे अभिलेख पडताळून आवश्यकतेनुसार ठोस प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. अवैध धंदे सदरात वारंवार छापे घालून केसेस उघडकीस आणून समाजकंटकाविरुद कारवाई केलेली आहे. भुसावळ शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकामी नियंत्रण कक्षास १ जास्तीचा स्ट्रायकिंग फोर्स देण्यात आला आहे. शहरातील वाढते गुन्हे व गुन्हेगारी नियंत्रणात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात धोकादायक वाड्यांचा काही भाग कोसळून जीवितहानी झाल्याबाबत**

**(४९) २५४९३ (१०-०८-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)पुणे शहरात गेल्या वर्षी धोकादायक वाड्यांचा काही भाग कोसळून जीवितहानी झाली होती, त्यावेळी भाडेकरुची नोंदणी करण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने जाहिर केले होते, परंतु अशी नोंदणी झाली नसल्याची बाब मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील धोकादायक जुने वाड्यांची महानगरपालिकेकडे नोंद नसल्याची व या वाड्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५)** :(१) पुणे शहरातील धोकादायक वाड्यांचा भाग कोसळून जीवितहानी झालेली नाही, तसेच भाडेकरुंची नोंद करण्याकरिता पुणे महानगरपालिकेकडून कोणताही धोरणात्मक निर्णय अद्याप झालेला नाही.
(२) हे खरे नाही. शहरातील धोकादायक जुना वाड्यांची नोंद पुणे महानगरपालिकेकडे आहे व वाड्याचे स्ट्रक्चरल ऑडिटचे काम सन २००८ पासून स्माईलेक्स व स्ट्रक्टवेल या तज्ञ सल्लागारांकडून सुरु आहे.
(३) धोकादायक वाड्यांवर महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आलेली आहे व उर्वरीत धोकादायक वाडे उतरविण्यचे काम चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करणेबाबत**

**(५०) २६२४३ (११-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात दररोज निघणाऱ्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या कंपोस्ट डेपोची जागा अपुरी पडत असल्याने महानगरपालिकेद्वारा नविन जागा शोधण्यासाठी सुरु केलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, किती जागा अधिग्रहीत केली आहे वा करण्याचे योजिले आहे, या जागेवर केव्हा पासून कंपोस्ट डेपो सुरु होणार आहे,
(३) असल्यास, जुन्या कंपोस्ट डेपो परिसरातील नागरीकांचे आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :**(१) कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही.
(२) विद्यान कंपोस्ट डेपोलगत मौजा पेठ येथे स.क्र.१५३, १५४ व १६३ एकूण क्षेत्र १८.४४ हे.आर. एवढी जमीन संपादित करण्यात आली आहे. तसेच मौजे पेठ येथील स.क्र.१४३ मधील १.९९ हेआर. ई क्लास शासकीय जागा मागणीचा प्रस्ताव दि.९/४/२०१५ रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केला आहे.

घनकचारा व्यवस्थापन प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार असल्याचे महानगरपालिका अमरावती यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारी महापालिकेकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.